*"Knowledge Scholar"*
*An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research*
*Volume: 02, Issue: 05, Sept.-Oct. 2015* *eISSN NO. 2394-5362*
*Impact Factor (IIFS) - 0.776*

# ''ललित मासिकात प्रकाशित झालेल्या साहित्याचा लेखसुचीत्मक अभ्यास (१९९५—२०१०)''

वत्सला भा. तायवाडे (प्रा.सौ रंजना व्यवहारे)
ग्रंथपाल,
विमेन्स कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड कॉमर्स
नागपूर **महाराष्ट्र, भारत**

डॉ. सौ. अपर्णा संजय चौधरी
ग्रंथपाल,
श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय,
नागपूर**, महाराष्ट्र, भारत**

**प्रस्तावना**

ललितच्या जन्माची कहाणी अतिशय रोचक आहे. 'मॅजेस्टिक'चे संस्थापक कै. केशवराव कोठावळे यांनी गिरगावच्या फुटपाथवर पुस्तकविक्रीला सुरूवात केली. १९४८ साली गिरगांव नाक्यावर 'मॅजेस्टिक बुक स्टॉल' या नावाने पुस्तक विक्री दूकान सुरू केले. १९४८ साली 'चंद्रकन्या', 'ठेंगुचे पराक्रम', 'जाडया—रडया', 'वासिलीचे भाग्य', विदिशेची राजकन्या', अशी छोटया मुलांसाठी पुस्तकेही केशवराव कोठावळे यांनी लिहिली आणि 'केशव कोठावळे प्रकाशन' या नावाने प्रसिध्द केली. १९५२ साली 'मॅजेस्टिक प्रकाशन' ची स्थापना झाली.

*Volume: 02, Issue: 05, Sept.-Oct. 2015* *eISSN NO. 2394-5362*
*Impact Factor (IIFS) - 0.776*

ग्रंथप्रेमी मंडळाच्या सहकार्याने ग्रंथलेखन, ग्रंथप्रसार आणि ग्रंथसंग्रह या विषयांना वाहिलेल्या 'ललित' मासिकाची सुरूवात केशवराव कोठावळे यांनी १९६४ साली केली. जानेवारी १९६४ मध्ये 'ललित' चा पहिला अंक प्रकाशित झाला. तो चोवीस पानाचा होता आणि त्याची किंमत पंचवीस नवे पैसे होती व त्याची वार्षिक वर्गणी होती दोन रूपये. आणि या अंकाचे संपादकीय लिहिले होते राम पटवर्धन यांनी. लेखक, प्रकाशक, पुस्तकविक्रेते व वाचक या ग्रंथव्यवहाराच्या क्षेत्रातील मुख्यपृठांमध्ये जिव्हाळयाचे संबंध निर्माण व्हावेत हा एक महत्वाचा उद्देश होता.

सर्वश्री गो.नी. दांडेकर, जयवंत दळवी, व्यंकटेश माडगूळकर, मधु मंगेश कार्णिक, अरूण साधू, वि.स. वाळिंबे, अनिल अवचट, सुभाश भेंडे, ह.मा. मराठे, वसंत सरवटे, भारत सासणे, मुकुंद टाकसाळे, यांसारखे अनेक मान्यवर साहित्यिक 'मॅजेस्टिक'शी जोडले होते. रंगनाथ पठारे, अनंत सामंत, राजन खान, निरंजन उजगरे, संजीव लाटकर, सदानंद देशमुख यासारखेही अनेक लेखक मॅजेस्टिकशी जोडले गेले.

'ललित' मासिकातर्फे ग्रंथप्रसारार्थ अनेक योजना कार्यान्वित केल्या जातात. दीपावलीने अनेक कादंबरी स्पर्धा आयोजित केल्या. या आयोजित केलेल्या कादंबरी स्पर्धेतून 'चक्र' ही जयवंत दळवी यांची कादंबरी प्रसिध्द केली. तसेच राजकीय कादंबरी स्पर्धाही घेण्यात आल्या. ग्रंथप्रसाराच्या दृष्टीने 'ललित' ने अनेक उपक्रम राबविले. साहित्यविषयक अनेक स्पर्धा 'ललित' घेत असते आणि वाचकांचा उत्तम प्रतिसादही मिळतो. ललित शिफारस, मानाचे पान, लक्षवेधी पुस्तके, वाचन आणि स्मरण यासारखी अनेक सदरे ललित मधून सुरू केली. लेखकाचे घर, दशकातील साहित्यिक, स्वागत, ठणठणपाल, काय लिहिताताय? काय वाचताय? गोमा गणेश,

"Knowledge Scholar"
An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research
Volume: 02, Issue: 05, Sept.-Oct. 2015 eISSN NO. 2394-5362
Impact Factor (IIFS) - 0.776

अलाणे— फलाणे, चोखंदळ वाचकांची निवड, सप्रेम नमस्कार, दृष्टिक्षेप, निर्मितीरंग, गप्पा—टप्पा, सौरभ, ग्रंथगप्पा, श्शहाणं पुस्तकवेड, यांसारखी अनेक वाचकप्रिय सदरे ललित मधून प्रसिध्द झाली होत असतात.

केशवराव कोठावळे कल्पक, उत्साही व उद्योगशील होते ते व त्याचे साहित्यिक मित्र याची कमी—अधिक प्रमाणात प्रत्येकाची प्रतिभा तल्लख होती. गुणवान लेखनाच्या बळावर अल्पावधीतच 'ललित' मासिक महाराष्ट्रातील फार मोठया वाचकवर्गाच्या हाती पोहचले. ललितच्या अस्तित्वाची उपयुक्तता प्रकाशक ग्रंथविक्रेते, व ग्रंथालये यांना विशेषत्वाने जाणवत गेली. वाड्मयक्षेत्रात घडणाऱ्या घडामोडीसंबंधी नवनवीन लेखकांसंबंधी व त्यांच्या निर्मितीसंबंधी कुतुहल असणाऱ्या वाचकांना 'ललित' मधून प्रसिध्द होणाऱ्या जाहिरातीमधून, पुस्तकांसंबंधी व ग्रंथयोजनासंबंधी माहिती मिळू लागली. ललितेवर लेखनही वाचनीय व उत्कणवर्धक भासते याचा साक्षात्कार 'ललित' च्या अंकामुळे वाचकांना झाला.

ग्रंथवाचन माणसाची जडणघडण करते व ग्रंथसंग्रहामुळे त्याच्या समृध्दीत भर पडले ही जाणीव जोपासावी असाही हेतू 'ललित' ने आपल्यासमोर ठेवला होता. वाचनसंस्कृती जोपासण्याचे महत्वाचे कार्य ललितेने केले आहे व करीत राहील यात शंका नाही. अशा चौफेर साहित्य निर्मिती करणाऱ्या मासिकातील प्रकाशित साहित्याचा अभ्यास या संशोधनकार्यात करण्यात आला आहे. याकरीता 'ललित' मासिकातील विविध सदरांखाली प्रकाशित होणाऱ्या लेखांची सन १९९५—२०१० पर्यंत संख्या माहित करून त्या माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण करण्यात आले, ते पूढील विभागात प्रस्तुत करण्यात आले आहे.

## ललित मासिकात प्रकाशित झालेल्या लेखांची संख्या

सारणी क्र. १: सन १९९५–२०१० दरम्यान ललित मासिकात प्रतिवार्षिक प्रकाशित झालेल्या लेखांची संख्या दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | वर्ष | संख्या | संचयी संख्या |
|---|---|---|---|
| १ | १९९५ | ११ | ११ |
| २ | १९९६ | ५१ | ६२ |
| ३ | १९९७ | १६ | ७८ |
| ४ | १९९८ | २२ | १०० |
| ५ | १९९९ | २७ | १२७ |
| ६ | २००० | २४ | १५१ |
| ७ | २००१ | २१ | १७२ |
| ८ | २००२ | २४ | १९६ |
| ९ | २००३ | २७ | २२३ |
| १० | २००४ | २५ | २४८ |
| ११ | २००५ | २१ | २६९ |
| १२ | २००६ | १८ | २८७ |
| १३ | २००७ | १८ | ३०५ |
| १४ | २००८ | २० | ३२५ |
| १५ | २००९ | ११ | ३३६ |
| १६ | २०१० | १७ | ३५३ |

वरील सारणी क्र. १ मध्ये सन १९९५–२०१० दरम्यान ललित मासिकात प्रतिवार्षिक प्रकाशित झालेल्या लेखांची संख्या दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार सन १९९५ मध्ये ललित मासिकात प्रतिवर्षिक ११ लेख प्रकाशित झाले असून वर्ष १९९६, १९९७, १९९८ व १९९९ मध्ये अनुक्रमे ५१, १६, २२ व २७ लेख प्रकाशित झाले आहेत. तसेच सन २०००, २००१, २००२, २००३, २००४,

http://www.ksijmr.com

*"Knowledge Scholar"*
*An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research*
*Volume: 02, Issue: 05, Sept.-Oct. 2015* *eISSN NO. 2394-5362*
*Impact Factor (IIFS) - 0.776*

२००५, २००६, २००७, २००८, २००९ व २०१० मध्ये ललित मासिकात प्रतिवर्षी अनुक्रमे २४, २१, २४, २७, २५, २१, १८, १८, २०, ११, १७ लेख प्रकाशित झाले आहेत. वरील माहिती वरून असे निदर्शनास येते की, सन १९९५–२०१० दरम्यान ललित मासिकात वर्ष १९९६ मध्ये सर्वाधिक लेख प्रकाशित झाले आहेत.

**ललित मासिकात मानाचे पान या सदराखाली प्रकाशित झालेल्या लेखांची संख्या**

सारणी क्र. २: सन १९९५–२०१० दरम्यान ललित मासिकात मानाचे पान या सदराखाली प्रतिवार्षिक प्रकाशित झालेल्या लेखांची संख्या दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | वर्ष | संख्या | संचयी संख्या |
|---|---|---|---|
| १ | १९९५ | ७ | ७ |
| २ | १९९६ | ८ | १५ |
| ३ | १९९७ | ४ | १९ |
| ४ | १९९८ | ८ | २७ |
| ५ | १९९९ | ९ | ३६ |
| ६ | २००० | ९ | ४५ |
| ७ | २००१ | ६ | ५१ |
| ८ | २००२ | ९ | ६० |
| ९ | २००३ | ९ | ६९ |
| १० | २००४ | १० | ७९ |
| ११ | २००५ | ९ | ८८ |
| १२ | २००६ | १० | ९८ |
| १३ | २००७ | ९ | १०७ |
| १४ | २००८ | ८ | ११५ |
| १५ | २००९ | ९ | १२४ |
| १६ | २०१० | १० | १३४ |

*"Knowledge Scholar"*
*An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research*
*Volume: 02, Issue: 05, Sept.-Oct. 2015* *eISSN NO. 2394-5362*
*Impact Factor (IIFS) - 0.776*

वरील सारणी क्र. २ मध्ये सन १९९५–२०१० दरम्यान ललित मासिकात मानाचे पान या सदराखाली प्रतिवार्षिक प्रकाशित झालेल्या लेखांची संख्या दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार सन १९९५ मध्ये ललित मासिकात मानाचे पान या सदराखाली ७ वेळा लेख प्रकाशित झाले असून वर्ष १९९६, १९९७, १९९८ व १९९९ मध्ये ललित मासिकात मानाचे पान या सदराखाली अनुक्रमे ८, ४, ८ व ९ वेळा लेख प्रकाशित झाले आहे. तसेच ललित मासिकात मानाचे पान या सदराखाली सन २०००, २००१, २००२, २००३, २००४, २००५, २००६, २००७, २००८, २००९ व २०१० मध्ये अनुक्रमे ९, ६, ९, ९, १०, ९, १०, ९, ८, ९, १० वेळा लेख प्रकाशित झाले असल्याचे आढळले. वरील माहिती वरून असे निदर्शनास येते की, सन १९९५–२०१० दरम्यान ललित मासिकात मानाचे पान या सदराखाली वष २००४, २००६ व २०१० मध्ये सर्वाधिक लेख प्रकाशित झाले आहे.

*"Knowledge Scholar"*
*An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research*
*Volume: 02, Issue: 05, Sept.-Oct. 2015* *eISSN NO. 2394-5362*
*Impact Factor (IIFS) - 0.776*

**ललित मासिकात प्रकाशित झालेल्या लक्षणिय पुस्तकांची संख्या**

सारणी क्र. ३: सन १९९५–२०१० दरम्यान ललित मासिकात प्रतिवार्षिक प्रकाशित झालेल्या लक्षणिय पुस्तकांची संख्या दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | वर्ष | संख्या | संचयी संख्या |
|---|---|---|---|
| १ | १९९५ | ७ | ७ |
| २ | १९९६ | ९ | १६ |
| ३ | १९९७ | ५ | २१ |
| ४ | १९९८ | १० | ३१ |
| ५ | १९९९ | ९ | ४० |
| ६ | २००० | ९ | ४९ |
| ७ | २००१ | ८ | ५७ |
| ८ | २००२ | १० | ६७ |
| ९ | २००३ | १० | ७७ |
| १० | २००४ | १० | ८७ |
| ११ | २००५ | ९ | ९६ |
| १२ | २००६ | १० | १०६ |
| १३ | २००७ | ९ | ११५ |
| १४ | २००८ | ९ | १२४ |
| १५ | २००९ | ८ | १३२ |
| १६ | २०१० | १० | १४२ |

वरील सारणी क्र. ३ मध्ये सन १९९५–२०१० दरम्यान ललित मासिकात प्रतिवार्षिक प्रकाशित झालेल्या लक्षणिय पुस्तकांची संख्या दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार सन १९९५ मध्ये ललित मासिकात ७ लक्षणिय पुस्तके प्रकाशित झाली असून वर्ष १९९६, १९९७, १९९८ व १९९९ मध्ये अनुक्रमे ९, ५, १० व ९ लक्षणिय पुस्तके प्रकाशित झाली आहेत. तसेच ललित मासिकात सन २०००,

२००१, २००२, २००३, २००४, २००५, २००६, २००७, २००८, २००९ व २०१० मध्ये अनुक्रमे ९, ८, १०, १०, १०, ९, १०, ९, ९, ८, १० लक्षणिय पुस्तके प्रकाशित झाली आहेत. वरील माहिती वरून असे निदर्शनास येते की, सन १९९५–२०१० दरम्यान ललित मासिकात वर्ष १९९८, २००२, २००३, २००४, २००६ व २०१० मध्ये सर्वाधिक म्हणजेच १० लक्षणिय पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

**ललित मासिकात दृटिक्षेप या सदराखाली प्रकाशित झालेल्या लेखांची संख्या**

सारणी क्र. ४: सन १९९५–२०१० दरम्यान ललित मासिकात दृष्टिक्षेप या सदराखाली प्रतिवार्षिक प्रकाशित झालेल्या लेखांची संख्या दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | वर्ष | संख्या | संचयी संख्या |
|---|---|---|---|
| १ | १९९५ | ६ | ७ |
| २ | १९९६ | ९ | १५ |
| ३ | १९९७ | ४ | १९ |
| ४ | १९९८ | ६ | २७ |
| ५ | १९९९ | ९ | ३६ |
| ६ | २००० | ७ | ४५ |
| ७ | २००१ | ७ | ५१ |
| ८ | २००२ | ५ | ६० |
| ९ | २००३ | ७ | ६९ |
| १० | २००४ | ९ | ७९ |
| ११ | २००५ | ९ | ८८ |
| १२ | २००६ | १० | ९८ |
| १३ | २००७ | ९ | १०७ |
| १४ | २००८ | ८ | ११५ |
| १५ | २००९ | ९ | १२४ |
| १६ | २०१० | १० | १३४ |

वरील सारणी क्र. ४ मध्ये सन १९९५–२०१० दरम्यान ललित मासिकात दृष्टिक्षेप या सदराखाली प्रतिवार्षिक प्रकाशित झालेल्या लेखांची संख्या दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार सन १९९५ मध्ये ललित मासिकात दृष्टिक्षेप या सदराखाली ६ लेख प्रकाशित झाले असून वर्ष १९९६, १९९७, १९९८ व १९९९ मध्ये अनुक्रमे ९, ४, ६ व ९ लेख प्रकाशित झाले आहेत. तसेच ललित मासिकात दृष्टिक्षेप या सदराखाली सन २०००, २००१, २००२, २००३, २००४, २००५, २००६, २००७, २००८, २००९ व २०१० मध्ये अनुक्रमे ७, ७, ५, ७, ९, ९, १०, ९, ८, ९, १० लेख प्रकाशित झाले आहेत. वरील माहिती वरून असे निदर्शनास येते की, सन १९९५–२०१० दरम्यान ललित मासिकात दृष्टिक्षेप या सदराखाली वर्ष २००६ व २०१० मध्ये सर्वाधिक १० लेख प्रकाशित झाले आहेत.

http://www.ksijmr.com

*"Knowledge Scholar"*
*An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research*
*Volume: 02, Issue: 05, Sept.-Oct. 2015* *eISSN NO. 2394-5362*
*Impact Factor (IIFS) - 0.776*

## ललित मासिकात मुक्काम पोस्ट या सदराखाली प्रकाशित झालेल्या लेखांची संख्या

सारणी क्र. ५: सन १९९५–२०१० दरम्यान ललित मासिकात मुक्काम पोस्ट या सदराखाली प्रतिवार्षिक प्रकाशित झालेल्या लेखांची संख्या दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | वर्ष | संख्या | संचयी संख्या |
|---|---|---|---|
| १ | १९९५ | ७ | ७ |
| २ | १९९६ | ९ | १६ |
| ३ | १९९७ | ५ | २१ |
| ४ | १९९८ | ८ | २९ |
| ५ | १९९९ | ९ | ३८ |
| ६ | २००० | ८ | ४६ |
| ७ | २००१ | ८ | ५४ |
| ८ | २००२ | ५ | ५९ |
| ९ | २००३ | १० | ६९ |
| १० | २००४ | १० | ७९ |
| ११ | २००५ | १० | ८९ |
| १२ | २००६ | ६ | ९५ |
| १३ | २००७ | . | . |
| १४ | २००८ | . | . |
| १५ | २००९ | . | . |
| १६ | २०१० | . | . |

वरील सारणी क्र. ५ मध्ये सन १९९५–२०१० दरम्यान ललित मासिकात मुक्काम पोस्ट या सदराखाली प्रतिवार्षिक प्रकाशित झालेल्या लेखांची संख्या दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार सन १९९५ मध्ये ललित मासिकात मुक्काम पोस्ट या सदराखाली ७ लेख प्रकाशित झाले असून वर्ष १९९६, १९९७, १९९८ व १९९९ मध्ये ललित मासिकात मुक्काम पोस्ट या सदराखाली अनुक्रमे ९, ५,

http://www.ksijmr.com

८ व ९ लेख प्रकाशित झाले आहेत. तसेच मुक्काम पोस्ट या सदराखाली सन २०००, २००१, २००२, २००३, २००४, २००५ व २००६ मध्ये ८, ८, ५, १०, १०, १० व ६ लेख प्रकाशित झाले आहे. वरील माहिती वरून असे निदर्शनास येते की, सन १९९५—२०१० दरम्यान ललित मासिकात मुक्काम पोस्ट या सदराखाली सन २००३ ते २००५ दरम्यान सर्वाधिक १० लेख प्रकाशित झाले आहे तसेच वर्ष २००७ ते २०१० दरम्यान एकही लेख प्रकाशित झाला नाही.

**ललित मासिकात मुलाखत या सदराखाली प्रकाशित झालेल्या लेखांची संख्या**

सारणी क्र. ६: सन १९९५—२०१० दरम्यान ललित मासिकात मुलाखत या सदराखाली प्रतिवार्षिक प्रकाशित झालेल्या लेखांची संख्या दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | वर्ष | संख्या |
|---|---|---|
| १ | १९९५ | ५ |
| २ | १९९६ | ७ |
| ३ | १९९७ | · |
| ४ | १९९८ | · |
| ५ | १९९९ | · |
| ६ | २००० | · |
| ७ | २००१ | · |
| ८ | २००२ | · |
| ९ | २००३ | · |
| १० | २००४ | · |
| ११ | २००५ | · |
| १२ | २००६ | · |
| १३ | २००७ | · |
| १४ | २००८ | · |
| १५ | २००९ | · |
| १६ | २०१० | · |

*"Knowledge Scholar"*
*An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research*
*Volume: 02, Issue: 05, Sept.-Oct. 2015* *eISSN NO. 2394-5362*
*Impact Factor (IIFS) - 0.776*

वरील सारणी क्र. ६ मध्ये सन १९९५–२०१० दरम्यान ललित मासिकात मुलाखत या सदराखाली प्रतिवार्षिक प्रकाशित झालेल्या लेखांची संख्या दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार सन १९९५ मध्ये ललित मासिकात मुलाखत या सदराखाली ५ लेख प्रकाशित झाले असून १९९६ मध्ये ७ लेख प्रकाशित झाले. तसेच ललित मासिकात मुलाखत या सदराखाली सन १९९७ ते २०१० दरम्यान एकही लेख प्रकाशित झाला नाही. वरील माहिती वरून असे निदर्शनास येते की, सन १९९५–२०१० दरम्यान ललित मासिकात मुलाखत या सदराखाली सन १९९६ मध्ये सर्वाधिक ७ लेख प्रकाशित झालेत.

http://www.ksijmr.com

*"Knowledge Scholar"*
*An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research*
*Volume: 02, Issue: 05, Sept.-Oct. 2015* *eISSN NO. 2394-5362*
*Impact Factor (IIFS) - 0.776*

### ललित मासिकात ग्रंथ गप्पा या सदराखाली प्रकाशित झालेल्या लेखांची संख्या

सारणी क्र. ७: सन १९९५–२०१० दरम्यान ललित मासिकात ग्रंथ गप्पा या सदराखाली प्रतिवार्षिक प्रकाशित झालेल्या लेखांची संख्या दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | वर्ष | संख्या |
|---|---|---|
| १ | १९९५ | · |
| २ | १९९६ | · |
| ३ | १९९७ | · |
| ४ | १९९८ | · |
| ५ | १९९९ | · |
| ६ | २००० | · |
| ७ | २००१ | · |
| ८ | २००२ | · |
| ९ | २००३ | · |
| १० | २००४ | · |
| ११ | २००५ | · |
| १२ | २००६ | · |
| १३ | २००७ | · |
| १४ | २००८ | ९ |
| १५ | २००९ | १० |
| १६ | २०१० | ७ |

वरील सारणी क्र. ७ मध्ये सन १९९५–२०१० दरम्यान ललित मासिकात ग्रंथ गप्पा या सदराखाली प्रतिवार्षिक प्रकाशित झालेल्या लेखांची संख्या दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार सन २००८, २००९ व २०१० मध्ये सन १९९५–२०१० दरम्यान ललित मासिकात ग्रंथ गप्पा या सदराखाली अनुक्रमे ९, १० व ७ लेख प्रकाशित झाले असून सन १९९५ ते २००७ दरम्यान एकही लेख प्रकाशित झाला

http://www.ksijmr.com

*"Knowledge Scholar"*
*An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research*
*Volume: 02, Issue: 05, Sept.-Oct. 2015* *eISSN NO. 2394-5362*
*Impact Factor (IIFS) - 0.776*

नाही. वरील माहिती वरून असे निदर्शनास येते की, सन १९९५—२०१० दरम्यान ललित मासिकात ग्रंथ गप्पा या सदराखाली सन २००९ मध्ये १० लेख प्रकाशित झाले झाले असून सन १९९५ ते २००७ दरम्यान एकही लेख प्रकाशित झाला नाही.

निष्कर्ष

मॅजेस्टिक प्रकाशनाच्या ललित मासिकातील विविध सदरातील लेखांच्या संख्येत वर्षागणिक बदल होत गेला आहे. वरील माहिती वरून असे निदर्शनास येते की, सन १९९५—२०१० दरम्यान ललित मासिकात एकुण लेख व मानाचे पान या सदराखाली प्रकाशित होणाऱ्या लेखांच्या संख्येत निरंतर वाढ होत आहे. त्याचप्रमाणे लक्षणिय पुस्तकांची माहिती व दृष्टिक्षेप या सदराखाली प्रकाशित होणाऱ्या लेखांच्या संख्येत देखील वर्षागणिक वाढ होत आहे. परंतु, मुलाखत व ग्रंथ गप्पा या सदराखाली प्रतिवार्षिक प्रकाशित झालेल्या लेखांच्या संख्येत अत्यल्प बदल झाला असल्याचे निदर्शनास आहे.

**संदर्भ ग्रंथसूची**


- जोशी, अ., ग्रंथालयीन संदर्भ सेवा, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे—३०, द्वितीयावृत्ती, १९९३.
- 'ललित', मॅजेस्टीक प्रकाशन, गिरगाव, मुंबई, ४४०००४
- लागू, त्र्य. हं., ग्रंथनिवड, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, प्रथमावृत्ती, १९८४.
- जैन, प्र., डाखोळे प्र., देशपांडे द., खेडकर अ., ''सूलभ ग्रंथालयशास्त्र'' विश्व पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रिब्यूटर्स, नागपूर, द्वितीयावृत्ती, २००९.

- आगलावे प्र., सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, श्री साईबाब प्रकाशन, धरमपेठ, नागपूर, तिसरी आवृत्ती २०१०.
- पवार एस.पी., बडकत्ते स., पवार, आर, ग्रंथालय व माहितीशास्त्र, फडके प्रकाशन कोल्हापूर, तिसरी आवृत्ती, २००९
- खैरनार दि., प्रगत सामाजिक संशोधन पध्दती व सांख्यिकी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती २००९, पृ.क्र.२९२—२९३.
- भांडारकर, पु.ल. सामाजिक संशोधन पद्धती, म.वि.ग्र.नि. मंडळासाठी विद्या बुक्स, औरंगाबाद, चौथी, १९९९९, पृष्ठ ५३४


http://www.ksijmr.com